## थोडक्यात पण महत्वाचे



### शिवसेना शहरप्रमुखांच्या वाढदिवसा निमित्त आरोग्य शिबीर संपन्न

ठाणे (स. गांवकरी) : दिवा शिवसेना शहरप्रमुख, नगरसेवक, माजी उपमहापौर तसेच नांदेड लोकसभा संपर्कप्रमुख रमाकांत मढवी यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून दि.०९ मे रोजी तिसाईनगर शिवसेना मध्यवर्ती शाखा, दातीवली, दिवा येथे भव्य मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सदर शिबीर सकाळी १० ते दुपारी ३ वाजेपर्यंत पार पडले. सदर शिबिरात रक्तदाब, मधुमेह, औषधोपचार सुविधा (NCD Van), मोफत चष्मे वाटप, दंत रोग तपासणी, X-Ray सुविधा, ECG तपासणी याशिवाय अनेक मोफत तपासण्या आरोग्य शिबिरात राबवल्या गेल्या प्रसंगी सदर शिबिरात मोठ्या संख्येने दिवेकर नागरिकांनी आपला सहभाग नोंदवला. प्रसंगी नगरसेविका व युवती अधिकारी साक्षी मढवी यांच्यासह नगरसेविका अर्चना पाटील, दर्शना म्हात्रे, दीपाली भगत तसेच नगरसेवक दीपक जाधव, आदेश भगत यांच्यासह शिवसेना शाखप्रमुख, विभागप्रमुख, उपविभाग प्रमुख तसेच अनेक पदाधिकारी व कार्येकर्ते उपस्थित होते.

### जय मल्हार विद्यालयाची उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम

अहिल्यानगर (स. गांवकरी) : पिंपळगाव रोठा तालुका पारनेर येथील जय मल्हार विद्यालयाच्या १० वी बोर्ड मार्च 2026 परीक्षेचा निकाल 95.83%टक्के लागला असून विद्यालयाने उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम ठेवली आहे. मार्च 2026 च्या बॅचमध्ये विद्यालयातील 25 विद्यार्थी प्रविष्ट झाले होते.विद्यालयाचा शेकडा निकाल 95.83% टक्के लागला आहे. प्रथम येणारे पाच विद्यार्थी पुढील प्रमाणे प्रथम वनिजा शिवाजी उमाप 87.60 %,द्वितीय प्रिया बाळु माकरे 81.60%,तृतीय प्रांजल भाऊसाहेब जगदाळे 81.00 %,चतुर्थ आदित्य अशोक सुपेकर 78.60%,पाचवी कांचन सुरेश मुंढे 78.40% संस्थेचे सचिव ॲड.पांडुरंग गायकवाड, विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री उत्तम सुंबरे यांनी शाळेने उत्कृष्ट निकालाची परंपरा राखल्यामुळे समाधान व्यक्त केले आहे. हे विद्यालय पूर्णपणे सेमी इंग्रजी असून या विद्यालयात ग्रामीण भागातील गोर गरीब, शेतकरी, शेतमजूर मुला-मुलींना दर्जेदार शिक्षण दिले जाते. विद्यालयातील या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे शिक्षक बी.आर उंडे ,जरांगे एन.बी.,गरकळ बी एस ,केदारी एन. बी यांचे उत्कृष्ट मार्गदर्शन लाभले आहे तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सुद्धा खूप सहकार्य मिळाले.परिसरातील ग्रामस्थ, पालक, हितचिंतक, माजी विद्यार्थी, विद्यार्थिनी यांनी विद्यालयाच्या या निकालाबद्दल सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे. व त्यांना भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

### विकास लवांडे यांच्यावर शाईफेक, भंडारेंच्या कृत्याचं जाहीर समर्थन



अहिल्यानगर (स. गांवकरी) : राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे प्रवक्ते विकास लवांडे यांच्यावर हल्ला झाल्याची घटना समोर आली आहे. किर्तनकार संग्राम भंडारे आणि त्यांच्या साथीदारांनी आळंदी परिसरात लवांडे यांना गाठत त्यांच्याशी असभ्य वर्तन केले. तसेच त्यांच्या अंगावर शाईच्या बाटल्या फेकण्यात आल्याचा आरोप आहे. यावेळी लवांडे यांना धमकीही देण्यात आल्याचे सांगितले जात आहे. या शाईफेकीचा व्हिडीओ समोर आला असून तो सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. आता संग्राम भंडारी यांनी केलेल्या कृत्याचे राष्ट्रवादी अजित पवार गटाचे आमदार संग्राम जगताप यांच्याकडून समर्थन करत त्यांचे अभिनंदन करण्यात आले आहे. संग्राम जगताप म्हणाले की, मी हभप संग्राम बापू भंडारे यांचे अभिनंदन करतो आणि समर्थ देखील करतो त्यांनी अत्यंत उत्कृष्ट प्रकारे आपल्या भावना व्यक्त केल्यात. त्यांनी जे केले त्या मागची भूमिका आपण लक्षात घेतली पाहिजे. महाराष्ट्राची आणि देशाची एक वेगळी परंपरा आहे. या परंपरेमध्ये आपल्या धर्माची पताका घेऊन जात असताना अनेक लोकांनी आपलं संपूर्ण जीवन धर्माकरिता समर्पित केले आहे. मात्र कोणीतरी उठतो आणि एखाद्या अधिकाऱ्यांसारखी यादी वाचतो. त्यामुळे बापूंनी जे केलेले आहे, त्याचे आम्ही हिंदुत्ववादी कार्यकर्ते म्हणून संपूर्ण महाराष्ट्राच्या वतीने अभिनंदन करतो. त्यांनी अत्यंत योग्य भूमिका बजावली. या लोकांना हिंदू धर्माविरोधात बोलायला कोण सांगत हे देखील लोकांसमोर यायला हवं, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिलीय.

### नगर शहरात जुगार अड्ड्यावर पोलिसांचा छापा; १८ जण ताब्यात

अहिल्यानगर (स. गांवकरी) : शहरातील रेल्वे स्टेशन रोडवरील लोखंडी पुलाजवळ चालणाऱ्या जुगार अड्ड्यावर भिंगार कॅम्प पोलिसांनी गुरुवारी (दि. ७) मध्यरात्रीच्या सुमारास छापा घातला. या छाप्यात हार-जितीचा जुगार खेळणाऱ्या तब्बल १८ जणांना पोलिसांनी ताब्यात घेतले. त्यांच्याकडून रोख रक्कम लॅपटॉप, मोबाईल व जुगाराचे असा ४ लाख ६७ हजारांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी पोलिस अंमलदार रविंद्र टाकळे यांच्या फिर्यादीवरून कोतवाली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांना माहिती मिळाली की, शहरातील रेल्वे स्टेशन परिसरात पत्र्याच्या शेडमध्ये जुगार अड्डा सुरू आहे. त्यांनी तत्काळ भिंगार कॅम्प पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक जगदीश मुलगीर यांना जुगार अड्ड्यावर छापा घालण्याचा आदेश दिला. त्यानुसार ७ मे रोजी रात्री एपीआय मुलगीर, पोलिस अंमलदार दिलीप शिंदे, प्रमोद लहारे, नंदकुमार पठारे, रवींद्र टकले आणि कोतवाली पोलिस ठाण्याचे उपनिरीक्षक गणेश देशमुख यांनी स्टेशन रोड लगत असलेल्या लोखंडी पुलाच्या बाजूला मोकळ्या जागेत सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर छापा घातला. त्यावेळी काही लोक जुगार खेळताना दिसून आले. पोलिस आल्याचे पाहून ते पळू लागले. पोलिसांनी मोबाईल, रोख रक्कम आणि जुगाराचे साहित्य असा ४ लाख ६७ हजारांचा मुद्देमाल जप्त केला. त्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिस अंमलदार भानुदास सोनवणे गुन्ह्याचा तपास करीत आहेत.

### ज्येष्ठ नेते कॉमरेड गंगारेड्डी बैनमवार यांचे निधन

किनवट (स. गांवकरी) : किनवट शहरातील ज्येष्ठ नेते तथा सामाजिक कार्यकर्ते कॉमरेड गंगारेड्डी बैनमवार यांचे आज दि.०९ मे रोजी पहाटे ६ वाजता वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या निधनाने किनवट शहरासह परिसरात शोककळा पसरली आहे. कॉ. बैनमवार यांनी किनवट नगर परिषदेत नगरसेवक तसेच उपनगराध्यक्ष म्हणून काम करताना शहराच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले. ते किनवट शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष म्हणूनही कार्यरत होते. भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे (CPI) ज्येष्ठ नेते म्हणून त्यांनी अनेक वर्षे सामाजिक व राजकीय क्षेत्रात सक्रिय भूमिका बजावली.

# बोगस इसम दाखवून शेतजमीनीचे खरेदीखत

अहिल्यानगर: (स. गांवकरी)



पोलीस निरीक्षक साहेब, एम.आय.डी.सी पोलीस स्टेशन अहिल्यानगर. याना दिनांक २२ एप्रिल रोजी बोगस इसम उभा करून डोंगरगण येथील शेतजमीनीचे खरेदीखत करून घेतले बाबत तक्रार अर्ज दाखल केला होता. त्यावर त्वरित कारवाई करून गुन्हा दाखल करावा अशी मागणी आज कमल पद्माकर शिरसाट,स्नेहा नरेंद्र शिरसाठ,राजेंद्र शिरसाठ,सागर शिंदे यांनी उपविभागीय पोलीस अधिकारी शिरीष वमने, अहिल्यानगर ग्रामीण विभाग यांना निवेदन देऊन करण्यात आली.

निवेदनात म्हटले आहे कि दि. २२ एप्रिल रोजी बोगस इसम उभा करून शेतजमीनीचे खरेदीखत करून घेतले बाबत तक्रार अर्ज दाखल केला यामध्ये म्हटले आहे कि, मनोज भाऊसाहेब कराळे,राहुल प्रकाश मांढरे,जुनेक रफिक इनामदार, भिमराव भाऊ चक्रनारायण(सदरील नाव खोटे असुन मुळ आरोपीचे नांव माहित नाही.) विनोद उबाळे, रा जन्म मृत्यु विभाग, शिरुर नगरपरिषद, शिरुर, जि.पुणे यांनी संगनमताने चक्रनारायण यांचा बोगस वारस उभा करुन त्यांचे नावची बोगस वारस नोंद लावलेली आहे. वास्तविक पहाता भाऊ नागोबा चक्रनारायण यांस भिमराव नावाचा मुलगा कधीही नव्हता व नाही. सदयस्थितीत भिमराव नाव धारण केलेल्या व्यक्तीने त्याचे वय ७५ दाखवले आणि शिरुर येथील नगर पालिका येथुन भिमराव भाऊ चक्रनारायण या नावाने मिळवलेला जन्म दाखला देखील बनावट आहे. कारण जन्म दाखल्यावर जन्मलेल्या मुलाचे नाव कधीच नसते फक्त वडील, आई व जन्म ठिकाण व जन्मलेल्या मुलाचे लिंग असे नमुद असते परंतु भिमराव हे नाव नंतर नव्याने समाविष्ट केल्याचे दिसुन येते. अशा रितीने शिरुर नगरपालिका येथील कर्मचारी देखील या कटात सामील असल्याचा संशय आहे. तेथील बनावट जन्म दाखल्यावरुन बनावट आधारकार्ड तयार करुन त्यानंतर इतर पुरावे तयार केलेली आहेत. या सर्व पुराव्याच्या तारखेचा मेळ घेतल्यास सर्व बनावटगिरी उघडकीस येईल. या बाबत दि. २२ एप्रिल ला यासंदर्भात एमआयडीसी पोलीस स्टेशनला तक्रार दाखल करण्यात आलेली आहे १५ दिवस उलटूनही यावर अजून गुन्हा दाखल झाला नाही तरी तो त्वरित दाखल व्हावा यासाठी उपाधीक्षकांना निवेदन देण्यात आले या संदर्भातील सर्व कागदपत्रे महसुली केलेले तक्रारी अर्ज व मनी साहेबांनी तक्रारदारांकडे मागून घेतली असून यासंदर्भात लवकरच योग्य ती कारवाई झालेली दिसेल असे आश्वासन दिले.

## विविध योजनांच्या लाभांचे वाटप; नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

भोकर : (स. गांवकरी)

शासनाच्या वतीने आयोजित करण्यात आलेले 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर' भोकर मंडळात गुरुवारी मोठ्या उत्साहात पार पडले. विविध शासकीय योजनांचा लाभ एकाच छताखाली उपलब्ध करून देण्यात आल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले. शिबिराचे अध्यक्ष म्हणून उपविभागीय अधिकारी प्रवीण मेंगशेट्टी उपस्थित होते, तर उद्घाटन भोकर नगर परिषदेचे नगराध्यक्ष भगवानराव दंडवे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी तालुका दंडाधिकारी विनोद गुंडमवार, परि. तहसीलदार अभयराज नंजुंडे, मुख्याधिकारी ऋषभ पवार, उपनगराध्यक्ष दिलीप सोनवडे तसेच नगरसेवक साईप्रसाद जटलावार, गौतम कसबे, संजय पाटील घंटालवार, सिद्धेश्वर पिटलेवाड, अविनाश वाघमारे, विकास क्षीरसागर आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व छत्रपती शिवाजी महाराज तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. तहसीलदार विनोद गुंडमवार यांनी प्रास्ताविकात शासनाच्या विविध योजनांची माहिती देत नागरिकांनी शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले. नगराध्यक्ष भगवानराव दंडवे यांनीही विविध विकास योजनांबाबत मार्गदर्शन केले. शिबिरात जिवंत सातबारा, भोगवटादार वर्ग २ ते वर्ग १ आदेश, उत्पन्न प्रमाणपत्र, रेशन कार्ड, संजय गांधी योजनेअंतर्गत प्रमाणपत्रे, आयुष्यमान कार्ड आदींचे वाटप करण्यात आले. तसेच एकात्मिक बाल विकास प्रकल्पांतर्गत गरोदर मातांना बेबी किट, अवजार बँक प्रमाणपत्र, ट्रॅक्टर वाटप तसेच नगर परिषदेमार्फत घरकुल लाभार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.



## ज्ञानसंपदा शाळेची शंभर टक्के निकालाची उज्वल परंपरा कायम

**विद्यार्थ्यांनी मिळवले घवघवीत यश**

(स. गांवकरी)

सन २०२५ - २६ या शैक्षणिक वर्षातील एस.एस.सी. बोर्ड परीक्षेत तपोवन रोडवरील उपक्रमशील व प्रयोगशील शाळा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ज्ञानसंपदा शाळेने शंभर टक्के निकालाची उज्वल परंपरा कायम राखत घवघवीत यश संपादन केले आहे. विद्यार्थ्यांच्या या उत्तुंग यशामागे संस्थेचे विश्वस्त, मुख्याध्यापिका, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी तसेच पालक वर्ग यांचा सिंहाचा वाटा आहे. अनुभवी शिक्षकांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत मोठी वाढ झाली असून यंदाचा निकाल अत्यंत अभिमानास्पद ठरला आहे. त्यामुळे शंभर टक्के निकालाची परंपरा अखंडित राहिली आहे. यावर्षीच्या निकालात गायकवाड ध्रुव याने ९७.८% गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. विशेष म्हणजे त्याने गणित व विज्ञान विषयात प्रत्येकी १०० पैकी १०० गुण मिळवले. वेदांत बर्वे याने ९६.२% गुण मिळवत द्वितीय क्रमांक मिळवला. ऋषभ वांडेकर याने ९६.00% गुणांसह तृतीय क्रमांक, तर नंदिनी खळेकर हिने ९५.६% गुण मिळवत चौथा क्रमांक पटकावला. भार्गवी परदेशी हिने ९५.४% गुणांसह पाचवा क्रमांक मिळवला. यावर्षी एकूण ७९ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. त्यापैकी ९०% पेक्षा अधिक गुण मिळवणारे २४ विद्यार्थी पात्र ठरले. तसेच ८० ते ८९ टक्क्यांच्या दरम्यान ३६ विद्यार्थी, ७० ते ७९ टक्क्यांच्या दरम्यान १४ विद्यार्थी आणि ६० ते ६९ टक्क्यांच्या दरम्यान पाच विद्यार्थी पात्र ठरले.

शाळेच्या सरासरी गुणांच्या टक्केवारीतही यंदा वाढ झाली असून ती ८५% पर्यंत पोहोचली आहे.

विषयनिहाय सरासरी पुढीलप्रमाणे : मराठी – ७८.२०%, इंग्रजी – ८३.४%, हिंदी/संस्कृत – ८५.१%, गणित – ८२% विज्ञान – ८४.६% , सामाजिक शास्त्र – ८३.५% विद्यार्थ्यांच्या या घवघवीत यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष प्रवीण बजाज, उपाध्यक्ष मिलिंद गंधे, मानद सचिव अरुण कुलकर्णी, खजिनदार . अविनाश बोपर्डीकर, स्कूल कमिटी चेअरमन कारभारी भिंगारे, श्रीहरी टिपूगडे, सुमित सोनवणे, विनोद बजाज, अक्षय वाघमोडे, शैक्षणिक सल्लागार डॉ. सुनिता भागवत तसेच मुख्याध्यापिका सौ. शिवांजली अकोलकर यांनी सर्व यशस्वी विद्यार्थी, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी व पालकांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## ॲड.अच्युत सदाशिव पिंगळे यांचा सहस्रचंद्रदर्शन गौरव सोहळा व "समर्पित" गौरवांकाचे प्रकाशन

**ॲड. उज्वल निकम,स्वामी गोविंददेवगिरीजी महाराज, प्रा.राम शिंदे यांची प्रमुख उपस्थिती**

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

प्रसिध्द विधिज्ञ ॲड.अच्युत सदाशिव पिंगळे यांचे ८० व्या वर्षात पदार्पण होत आहे. यानिमित्त अँड.पिंगळे यांचा"गौरव सोहळा" व त्यांच्या जीवनकार्य प्रवासावर आधारित "समर्पित" गौरव अंकाचे प्रकाशन मंगळवार दि.१२ मे २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता माऊली सभागृह, झोपडी कॅन्टीनजवळ, सावेडी येथे अयोध्या येथील श्री रामजन्मभूमी तीर्थक्षेत्र,न्यासाचे कोषाध्यक्ष प.पू.स्वामी गोविंददेवगिरीजी महाराज यांच्या हस्ते गौरव सत्कार संपन्न होत आहे.




या कार्यक्रमाचे अध्यक्ष खासदार राज्यसभा व सरकारी वकील मा.खा.ॲड.उज्वल निकम हे आहेत."समर्पित" गौरव अंकाचे विमोचन महाराष्ट्र राज्य विधान परिषदेचे सभापती नामदार प्रा.राम शिंदे यांच्या हस्ते होणार आहे.यावेळी बेलापूर येथील गोविंद गोधामचे प.पू.आचार्य महेशजी व्यास यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा संपन्न होणार आहे. प्रथितयश विधिज्ञ आणि त्यागमूर्ती समाजसेवक ॲड.अच्युतराव सदाशिव पिंगळे यांनी विद्यमान भारतीय जनता पक्षाचे पहिले जिल्हा सरचिटणीस म्हणून केलेले अलौकिक कार्य तसेच वकिली व्यवसाय करताना अनेक गोरगरीब नागरिकांना विनामोबदला न्याय दिला.व गोरगरीबांसाठी अंत्यसंस्कार मंडळाच्या माध्यमातून मदत केली.अशा अनेक सामाजिक कार्यात झोकून देऊन काम केले आहे.ॲड.अच्युतराव सदाशिव पिंगळे यांच्या कार्याचा गौरव सोहळा संपन्न होणार आहे.या कार्यक्रमासाठी नगरकरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे.असे आवाहन समितीचे अध्यक्ष ॲड. विश्वासराव आठरे पाटील,उपाध्यक्ष प्रा. भानुदास बेरड,स्वागताध्यक्ष वसंत लोढा,प्रमुख कार्यकारिणी सदस्य राजेंद्र चोपडा,राजेंद्र गांधी,सचिव राजेंद्र काळे, कोषाध्यक्ष डी.एम. कुलकर्णी आणि सर्व कार्यकारिणी सदस्य यांनी केले आहे.

## भरडधान्य उत्पादक शेतकऱ्यांना तफावत अनुदान द्यावे

किनवट : (स. गांवकरी)



भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय प्रवक्ते आकाश सुभाषराव जाधव यांनी नांदेड जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांची (दि.०८) रोजी भेट घेऊन किनवट-माहूर विधानसभा क्षेत्रातील भरडधान्य (मका व ज्वारी) उत्पादक शेतकऱ्यांच्या विविध समस्यांकडे लक्ष वेधले. यावेळी त्यांनी रबी हंगामातील ज्वारी व मका उत्पादक शेतकऱ्यांना शासनाने जाहीर केलेल्या हमीभाव आणि प्रत्यक्ष बाजारभावातील तफावत रक्कम अनुदान स्वरूपात थेट बँक खात्यात जमा करून दिलासा द्यावा, अशी मागणी करणारे सविस्तर निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना सादर केले. यावेळी भरडधान्य खरेदी प्रक्रियेमध्ये निर्माण झालेला गोंधळ, खरेदी केंद्र सुरू होण्यास झालेला विलंब, ऑनलाईन नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांची गैरसोय, अपुरी खरेदी व्यवस्था तसेच खासगी व्यापाऱ्यांकडून कमी दराने सुरू असलेली खरेदी या गंभीर विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. आकाश जाधव यांनी सांगितले की, किनवट-माहूर विधानसभा क्षेत्र हे आदिवासी व शेतीप्रधान क्षेत्र असून येथे मोठ्या प्रमाणावर मका व ज्वारी पिकांची लागवड करण्यात आली आहे. शासनाने ज्वारीसाठी प्रति क्विंटल ३,६९९ रुपये तर मक्यासाठी २,४०० रुपये हमीभाव जाहीर केला असला तरी प्रत्यक्षात शेतकऱ्यांना बाजारात अत्यल्प दर मिळत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान होत आहे.

## अकरावीचे वेळापत्रक जाहीर

अहिल्यानगर: (स. गांवकरी)

इयत्ता दहावीचा निकाल जाहीर होताच शिक्षण संचालनालयाने अकरावी प्रवेशाचे वेळापत्रक जाहीर केले. त्यानुसार विद्यार्थ्यांना अकरावी प्रवेशाच्या अर्जाचा दुसरा भाग ११ मेपासून विद्यार्थ्यांना भरता येणार आहे. तर प्रवेशाची तात्पुरती गुणवत्तायादी १५ मे रोजी, तर पहिली गुणवत्तायादी २६ मे रोजी जाहीर करण्यात येणार आहे. गतवर्षीपासून अकरावी प्रवेश प्रक्रिया संपूर्ण राज्यामध्ये ऑनलाईन पद्धतीने राबविण्यात येत आहे. विद्यार्थ्यांना अर्ज भरण्यास अडचण येऊ नये यासाठी शिक्षण संचालनालयाने १० एप्रिलपासून अर्जाचा भाग १ भरण्यास सुरुवात केली आहे. त्यानुसार ८ मेपर्यंत ७ लाख ७४ हजार ९१८ विद्यार्थांनी प्रवेश अर्जाचा भाग १ भरून नोंदणी केली आहे. दहावी परीक्षेचा निकाल जाहीर होताच शिक्षण संचालनालयाने अकरावी प्रवेशाचे वेळापत्रक जाहीर केले आहे. या प्रक्रियेमध्ये तीन नियमित फेऱ्या, ओपन टू ऑल चौथी फेरी, मुलींकरिता विशेष पाचवी फेरी राबविण्यात येणार आहे. प्रवेश प्रक्रियेचे जाहीर करण्यात आलेल्या वेळापत्रकानुसार ८ ते १० मे या कालावधीत विद्यार्थी नोंदणी व अर्जाचा भाग १ ऑनलाइन सादर करता येईल. ११ ते २० मेदरम्यान शून्य फेरी राबविण्यात येणार आहे. व्यवस्थापन, इन- हाऊस, अल्पसंख्याक कोट्यासाठी ११ ते १३ मेदरम्यान विद्यार्थ्यांना शून्य फेरीसाठी अर्जाचा भाग २ भरता येणार आहे. १५ मे रोजी तात्पुरती गुणवत्तायादी जाहीर करण्यात येईल. या गुणवत्तायादीवर १६ मे रोजी विद्यार्थ्यांना हरकती सादर करता येणार आहेत. १८ मे रोजी सर्वसाधारण गुणवत्तायादी अंतिम करण्यात येणार आहे. तसेच शून्य फेरीसाठी जागांचे वाटप करण्यात येणार आहे. २० मे रोजी पहिल्या फेरीसाठी कोट्यांच्या जागांसह रिक्त जागांचा तपशील जाहीर करण्यात येणार आहे.पहिल्या फेरीला २१ मेपासून सुरुवात होणार असून, २१ ते २२ मेदरम्यान विद्यार्थ्यांना अर्जाच्या भाग १ मध्ये बदल करणे, भाग २ भरता येणार आहे. त्यानंतर २६ मे रोजी पहिली फेरी जाहीर करण्यात येईल.

# १६ तोळे सोने हस्तगत

## नगर तालुक्यातील लग्नसमारंभातील सोन्याची चोरी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश

अहिल्यानगर : (स. गांवकरी)




लहान मुलांकरवी लग्न समारंभातून सोन्यावर डल्ला मारणाऱ्या छडा लावण्यात अखेर पोलिसांना यश मिळाले. चोरट्यांचा मोहल्ला ओळख असलेल्या मध्यप्रदेशातील चार गावात जोखीम पत्करून दोन दिवस कोम्बिंग ऑपरेशन राबवत पोलिसांनी १६ तोळे सोने हस्तगत केले.

यापूर्वी बसमधून चोरी झालेले सोने कोतवाली पोलिसांनी मोठ्या कौशल्याने हस्तगत केले होते. आता लग्न समारंभातून चोरी गेलेल्या सोन्याचा छडा लावत कौतुकास्पद कामगिरी केली. सोनेवाडी रस्त्यावरील श्रेया गार्डनमधील साखरपुडा समारंभातून शिक्षिका सिंधू महेश माने यांनी सोने ठेवलेली कापडी पिशवी २ मे रोजी चोरी झाली होती. तसा गुन्हा कोतवाली पोलिस ठाण्यात दाखल होता. पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेजचा आधार घेतला. त्या पाहणीत अल्पवयीन मुलगा चोरी करत असल्याचे दिसून आले. यापूर्वीही शहरात लग्न, साखरपुडा तसेच कौटुंबिक समारंभातून लहान मुलांनी चोरी झाल्याचे प्रकार घडलेले होते. तीच टोळी पुन्हा सक्रीय झाल्याचा संशय बळवताच पोलिसांनी त्या मुलाची शोध मोहीम हाती घेतली. तपासाअंती थेट मध्यप्रदेशातील टोळीचा सुगावा लागला.पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर अधीक्षक वैभव कलुबर्मे यांच्या मार्गदर्शनाखाली कोतवालीचे सहाय्क पोलिस निरीक्षक कुणाल सपकाळे, अंमलदार विनोद बोरगे, विशाल दळवी, सुरज कदम यांचे खास पथक थेट मध्यप्रदेशात पोचले. मध्यप्रदेशातील राजगड जिल्ह्यातील बोटा पोलिस ठाण्यातंर्गत चार गावांत या पोलिस पथकाने स्थानिक पोलिसांच्या मदतीने दोन दिवस कोम्बिंग ऑपरेशन राबविले. ज्या गावात पोलिसांनी शोध मोहीम राबविली ती गावे चोरांचा मोहल्ला म्हणून ओळखली जातात. सीसीटीव्हीत दिसणाऱ्या अल्पवयीन मुलाचा छडा लावण्याकरीता त्याच्या नातेवाईकांना पोलिस पथकाने ताब्यात घेतले. सुरूवातीला ते नाकबुल गेले, पण सीसीटीव्हीत कैद चित्रीकरण दाखवतच त्यांनी कबुली दिली. त्यानंतर चोरीचे १६ तोळे पोलिसांच्या हवाली केले. चोरी करणाऱ्या अल्पवयीन मुलास पोलिसांनी नोटीस दिली असून कायदेशीर प्रक्रिया सुरू केली आहे. कोतवालीचे पोलिस ज्यावेळी त्या गावात पोहचले, त्याचवेळी तेथे दिल्ली, गोवा आणि उत्तर प्रदेशचे पोलिसही अशाच प्रकारच्या गुन्ह्याच्या तपासासाठी आले होते. राजगड जिल्ह्यातील चार गावात लहान मुलांकरवी चोरी करणाऱ्या टोळ्या सक्रीय आहेत. अशा गावात जात तेथून १६ तोळे सोने हस्तगत करणे ही धाडसी कारवाई मानली जाते.